दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजय भांगे

बीड/महाराष्ट्र ● बुधवार दि.१८ डिसेंबर २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक-११० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

## रामदास आठवलेंची भाजपने मागितली माफी

**पुणे (वृत्तसंस्था)**–महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा रविवारी विस्तार झाला. नागपूरच्या राजभवनमध्ये पार पडलेल्या या सोहळ्याचे महायुतीचा भाग असलेले रामदास आठवले यांना निमंत्रणच देण्यात आले नव्हते. यावरून रामदास आठवले यांनी आपली नाराजी उघडपणे जाहीर केली होती. रामदास आठवलेंच्या नाराजीवरून भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांची माफी मागितली आहे. आमच्याकडून चूक झाल्याचे बावनकुळे म्हणाले.नागपूर येथील राजभवनमध्ये मंत्रिमंडळाचा शपथविधी पार पडला. यामध्ये ३३ जणांनी कॅबिनेट तर ६ जणांनी राज्यमंत्रीपदाची घेतली. सरकारकडून या शपथविधी सोहळ्याचे विरोधी पक्षाला निमंत्रण गेले होते. मात्र महायुतीत सहभागी असलेल्या रिपाइं आठवले गटाला निमंत्रण देण्याचे राहून गेले. त्यामुळे रामदास आठवले नाराज झाले होते. त्यांच्या नाराजीची भाजपने अखेर दखल घेतली आहे.मंत्रिमंडळ विस्ताराचे निमंत्रण न भेटल्यामुळे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी रामदास आठवले यांची माफी मागितली.

# विरोधकांनी राजकारण करायचे ठरवल्यास राजकीय उत्तर मिळेल-फडणवीसांचा विरोधकांवर निशाणा

## आम्ही ओबीसीसाठी बरीच कामे केली;पटोले, वडेट्टीवारांनी योग्य ठिकाणी राग काढावा

**नागपूर (वृत्तसंस्था)–विधीमंडळात चर्चा करण्याची तयारी असेल, तर खोटे बोलू नका, असे आव्हान अंबादास दानवे यांनी सरकारला केले होते. त्यांच्या या आव्हानाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सडेतोड उत्तर दिले. आम्ही चर्चा करायला तयार आहोत. पण विरोधकांनी राजकारण करायचे ठरवल्यास त्यांना राजकीय उत्तर मिळेल, असे फडणवीस म्हणाले. तसेच सुधीर मुनगंटीवार यांना विशिष्ट जबाबदारी देण्याचा पक्षाचा मानस असल्यामुळे त्यांना मंत्रिमंडळात घेतले नसल्याचे ते म्हणाले. विधीमंडळात चर्चा करण्याची तयारी असेल, तर खोटे बोलू नका, असे आव्हान विधान परिषद विरोधी पक्षनेता अंबादास दानवे यांनी सरकारला केले होते. या आव्हानाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिले आहे. विरोधकांनी महत्वाच्या विषयांवर हवी ती चर्चा करावी. सरकार उत्तर द्यायला सक्षम आहे. सरकार कुठलीही बाजू लपवून ठेवणार नाही, मागे-पुढे पाहणार नाही. मात्र विरोधकांनी केवळ राजकारण करायचे ठरवले, तर राजकीय उत्तर मिळेल, असे सडेतोड उत्तर देवेंद्र फडणवीस यांनी अंबादास दानवे यांना दिले.**



३५ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडलेल्या आहेत. त्या सर्व मागण्या चर्चेनंतर लवकरच मंजूर होतील, असे फडणवीसांनी सांगितले. ते म्हणाले, महाराष्ट्राचा अर्थसंकल्प ६ लाख कोटींपेक्ष मोठा आहे. आपला अर्थसंकल्प २-अडीच लाख कोटींचा होता, तेव्हाही १५ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या मांडायचो. जेव्हापासून आपण नवीन अकाउंटींग सुरू केल्यापासून पुरवणी मागण्यांची संख्या वाढलेली आहे.काँग्रेस पक्षाला ओबीसींबद्दल बोलायचा अधिकार नाही. काँग्रेसने त्यांच्या उभ्या आयुष्यात ओबीसींवर अन्याय करण्याच्या व्यतिरिक्त काहीही केले नाही. महाराष्ट्रातील ओबीसी मंत्रालय मी मुख्यमंत्री असताना स्थापन झाले. मी आणि शिंदे साहेब असताना ओबीसी समाजासाठी बरीच कामे केली आहेत. काँग्रेसने केलेले दाखवण्यासारखे एकही काम नाही.देशातही इतक्या वर्षांनंतर ओबीसी समाजाला संवैधानिक दर्जा मोदींनी दिला. ६०-६५ वर्षांनंतर मेडिकल प्रवेशात ओबीसींना आरक्षण दिले. आजही मोदींचे किंवा आमच्या मंत्रिमंडळात सर्वाधिक ओबीसी मंत्री पहायला मिळतात. काँग्रेसमध्ये नाना पटोले आणि विजय वडेट्टीवार यांच्यावर जो अन्याय होतो, त्याचा राग आमच्यावर न काढता योग्य ठिकाणी काढावा, असा टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी लगावला.पद्मविभूषण जाकीर हुसेन यांच्या निधनाने तबल्यातून ताल गेला. तशी पोकळी कला क्षेत्रात निर्माण झाली आहे. तबला वादनाला आंतरराष्ट्रीय स्वरूप त्यांनी दिले. तीन पिढ्यांना त्यांच्या मैफिलीने मंत्रमुग्ध केले. त्यांच्या बोटातील जादू बघणे एक पर्वणी होती. लाखो तरुणांना तबलावादनाकडे आकृष्ट केले. उस्ताद जाकीर हुसेन यांच्यासारखा तबला वाजण्याचे प्रत्येक तबला वादकाचे ध्येय असायचे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तबला वादक जाकीर हुसेन यांना श्रद्धांजली अर्पण केली.सुधीन मुनगंटीवार यांना मंत्रिमंडळात न घेतल्याने ते नाराज असल्याच्या चर्चांवरही देवेंद्र फडणवीसांनी भाष्य केले. सुधीर मुनगंटीवार आमचे ज्येष्ठ नेते आहेत. पक्षाने काही लोकांना मंत्रिमंडळात न घेण्यामागे त्यांना काही विशिष्ट जबाबदारी देण्याचा मानस तयार केला आहे. पक्ष आणि सरकार दोन्ही गोष्टी चालवायच्या असतात. त्यामुळे काहीवेळी सरकारमध्ये काम करणारे पक्षात काम करतात आणि पक्षात काम करणारे सरकारमध्ये काम करतात. सुधीर मुनगंटीवार अनुभवी नेते आहेत. महाराष्ट्र अध्यक्ष राहिलेले आहेत. त्यामुळे केंद्रीय पक्षाने त्यांच्याबद्दल काही विचार करूनच त्यांना मंत्रिमंडळात घेतलेले नाही, असे स्पष्टीकरण देवेंद्र फडणवीस यांनी केले.

### पात्र महिला खेळाडूंना प्रशासनात थेट नियुक्ती द्या

## खा. सोनवणेंनी केंद्रीय क्रीडा मंत्र्यांची भेट घेत मांडला मुद्दा

**केज । प्रतिनिधी**

स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडिया अंतर्गत सलग तीन वर्षे राष्ट्रीय पातळीवर खेळलेल्या महिला खेळाडूंना थेट वर्ग एक पदी नियुक्ती देण्यात येत असे. परंतु मागील दहा वर्षात अशी नियुक्ती दिलेली नाही. यापुढे लाडली बहन म्हणून पात्र महिला खेळाडूंना प्रशासनात थेट नियुक्ती द्यावी, अशी मागणी खा. बजरंग सोनवणे यांनी मनसुख मांडविया, केंद्रीय क्रीडा मंत्री व रक्षा खडसे, क्रीडा राज्यमंत्री यांना निवेदनाव्दारे केली आहे.

केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया, आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षाताई खडसे यांना भेटून दिलेल्या निवेदनातम्हटले आहे कि, स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडिया, भारत सरकार अंतर्गत राष्ट्रीय पातळीवरील



सलग तीन वर्ष फुटबॉल खेळलेल्या महिला खेळाडू राज्यांचे व देशाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी मोठ्या मेहनतीने खेळतात. या महिला खेळाडूंच्या योगदानाला मान्यता मिळावी आणि त्यांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी लाडली बहन खेळाडू म्हणून पावले उचलण्याची आवश्यकता आहे.त्या अनुषंगाने, सलग तीन वर्षे राष्ट्रीय पातळीवर खेळलेल्या महिला खेळाडूंच्या लाडली बहन म्हणून थेट भरतीसाठी धोरण तयार करावे. केंद्रीय किंवा राज्य सरकारमध्ये त्यांना वर्ग-१ च्या नोकऱ्या देऊन त्यांच्या [illegible] योग्य न्याय द्यावा, यामुळे त्यांच्या योगदानाचा सन्मान होईल. तसेच भविष्यात अधिकाधिक महिला खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर खेळण्यासाठी प्रेरणा मिळेल. यासंदर्भात लवकरात लवकर निर्णय घ्यावा आणि त्याची तातडीने अंमलबजावणी करावी, असेही म्हटले आहे. यावेळी राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी ही मागणी अतिशय चांगली असून आपण लवकरच याबाबत निर्णय घेवू, असे आश्वासन देखील दिले. एकट्या बीड जिल्ह्यात राष्ट्रीय पातळीवर सलग तीन वर्षे खेळलेल्या खेळाडूंची संख्या ५० च्या घरात आहे. खा. सोनवणे यांनी केलेल्या मागणीनुसार निर्णय झाल्यास देशातील लाडक्या बहिनींना

## चेरीच्या झाडांची लागवड करुन खा.पवार यांचा वाढदिवस साजरा



**अंबाजोगाई (प्रतिनिधी):** १२ डिसेंबर रोजी मौजे ममदापूर पाटोदा येथ जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मैदानात. खासदार शरदचंद्र पवार यांच्या वाढदिवसानिमित्त चेरीच्या झाडाची लागवड करण्यात आली. हा कार्यक्रम वृक्षमित्र अभियान च्या वतीने घेण्यात आला.

याप्रसंगी. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती सीताबाई धपाटे, विजयमला सातभाई , रीना बनसोडे, बालाजी टिळे सर, वृक्षमित्र अभियान चे अध्यक्ष वनश्री सुधाकर देशमुख शाळेतले विद्यार्थी उपस्थित होते. एक पेड मा के नाम.. याच कार्यक्रमाचा एक भाग म्हणून आज वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. प्रत्येक विद्यार्थ्यांनी. आपल्या आई वडिलांच्या नावाने किमान एक तरी झाड लावावे असे आव्हान वृक्षमित्र वनश्री सुधाकर देशमुख यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना केले आहे. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी आणि आपल्या प्रियजनांच्या वाढदिवसानिमित्त प्रत्येकाने झाडांची लागवड करून त्याचे संगोपन करावे असे आवाहन करण्यात आले.

## मराठवाडा सुजलाम सुफलाम करण्यासाठी सिंचनाचे प्रश्न मार्गी लावणार

### केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील यांची खा.डॉ.अजित गोपछडे यांना ग्वाही

**नांदेड । हानुमंत चंदनकर**

नांदेड मराठवाड्यातील कोरडा दुष्काळ संपवून या भागाला सुजलाम सुफलाम करण्याचे अनुषंगाने मराठवाड्यातील सिंचनाचे प्रश्न मार्गी लावू असा विश्वास केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील यांनी दिला. या अनुषंगाने खा.डॉ. अजित गोपछडे यांनी केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे . खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या पाठपुराव्याला आता यश मिळत आहे.

गेल्या ७० वर्षात मराठवाड्याच्या विकासाचा अनुशेष भरून काढण्यात काँग्रेस सरकारला यश आले नव्हते. त्यामुळे मराठवाडा नेहमीच कोरड्या दुष्काळाच्या सावटात होरपळला आहे. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांमध्ये निर्माण होणारा कोरडा दुष्काळ हा भयावह असतो. त्यामुळे या भागातील शेकडो शेतकऱ्यांना आत्महत्या करून आपले जीवन संपवावे लागले. हजारो शेतकऱ्यांचे संसार उघड्यावरती आले आहेत. ही बाब लक्षात



घेता मराठवाड्यातील शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने सुखाचे दिवस दाखविण्यासाठी या भागातील नद्यांना बारमाही पाणी राहिले पाहिजे. सिंचन प्रश्न मार्गी लागला पाहिजे त्यासाठी उत्तर महाराष्ट्रातील आणि पश्चिम महाराष्ट्रातील बारमाही वाहणाऱ्या नदीतील पाणी गोदावरी नदीसह या भागातील अन्य नदी पात्रात सोडण्याचे अनुषंगाने वॉटरग्रीड प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यात यावा. नद्या जोड प्रकल्प राबवून मराठवाड्यातील कोरडा दुष्काळ कायमचा नाहीसा करावा. शिवाय या भागातील शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी नांदेड जिल्ह्यातील बिलोली तहसील परिसरात आयसीएआर अंतर्गत केंद्रीय दुष्काळी कृषी आणि गवत संशोधन संस्थेचे मिशन कार्यालय उभारण्यात यावे. अशी मागणी खा.डॉ. अजित गोपछडे यांनी केली होती. या सर्व मागणीच्या अनुषंगाने केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील यांनी सकारात्मक भूमिका घेतली असून मराठवाड्यातील कोरडा दुष्काळ कायमचा नाहीसा करण्याचे अनुषंगाने या भागात सिंचनाचे नवे प्रकल्प राबविण्यात येतील. त्यासाठी केंद्र सरकार भरघोस निधी उपलब्ध करून देईल असा विश्वास दिला . दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या नमामि गंगा या महत्वकांक्षी प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर नमामि गोदावरी प्रकल्प राबवून गोदावरी नदीच्या शुद्धीकरणासाठी सकारात्मक पावले उचलण्यात येणार असल्याची माहिती ही केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील यांनी दिली.

## उरण महाविद्यालयाचे निवासी श्रमसंस्कार शिबिर संपन्न

**उरण । विठ्ठल ममताबादे**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिर खोपटे बांधपाडा ता. उरण जि. रायगड येथे संपन्न झाले. युवक व माझा भारत युवक व डिजिटल साक्षरता ही शिबिराची मुख्य थिम होती. शिबिराचे उद्घाटन संस्थेचे मुख्यकार्यकारी अधिकारी प्रदीपचंद्र शृंगारपुरे यांच्या हस्ते झाले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर महत्त्वाचे असल्याचे सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य के. ए. शामा यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात विशाल पाटेकर, आय क्यु ए सी समन्वयक डॉ.ए.आर. चव्हाण आदी उपस्थित होते. सबंध सात दिवसीय शिबिरात तलाव परिसर, स्मारक परिसर, तसेच शाळा परिसर स्वच्छ करण्यात आला. त्याचबरोबर स्वच्छता व पर्यावरणाचा संदेश देणारी प्रभात फेरी




आयोजित करण्यात आली. गावाचे पर्यावरण तसेच महिला सक्षमीकरण इत्यादी विषयांवर कार्य करण्यात आले. शिबिरात विविध मान्यवरांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले. संजीवन म्हात्रे,जितेंद्र लाड, जयंत ठाकूर, दौलत पाटील, हितेंद्र घरत आदींनी विविध विषयांवर व्याख्याने दिली. समारोपीय कार्यक्रमात महाविद्यालय विकास समितीचे सदस्य रमेश ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले.महिला सामाजिक कार्यकर्त्या राणी सुरज म्हात्रे व उरण नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष सायली सविन म्हात्रे ह्या प्रमुख पाहुण्या होत्या. प्राचार्य के.ए. शामा यांनी शिबिरात शिकलेली कौशल्य जीवनात उतरवावीत असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. आरती पाटील ने केले तर अहवाल वाचन कु. प्राप्ती पांगुळ हिने केले. स्वागत परिचय कुमारी नम्रता चव्हाण व सोहम जाधव यांनी केले. याप्रसंगी कु. मनीषा मोहिते कुमार शुभम जयस्वाल कुमारी भूमिका गुडेकर व कुमारी भूमिका भोसले आदींनी आपली अनुभव कथन केले. संपूर्ण शिबिराचे आभार प्रदर्शन राष्ट्रीय योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी केले.

## रानडुकरांचा बंदोबस्तासाठी सौरकुंपन योजना सुरू करावी-शिवराम राऊत

**शिरूर (प्रतिनिधी):** बीड जिल्ह्यातील सर्वाधिक कपाशीची लागवड करणारा शिरुर तालुक्यात ऑगस्ट-सप्टेबंर महिन्यातील अति पावसाने खरिप हंगामी लागवड असणारे कपाशी,सोयाबिन,व तुर पीकांचे अधिकचे नुकसान झाल्याने व पर्जन्यमान व परतीच्या पावसामुळे तालुक्यातील रब्बी हं.पीकांची लागवड क्षेत्रात वाढ होऊन ज्वारी, भूईमुग, मका,कांदा, हरभरा,असी पीक क्षेत्रात लागवड आहे.पीक देखील जोमात आहेत.परंतु अनेक शेतक-यांच्या पीकांची नासाडी होत आहे.थंडीचे प्रमाण वाढल्याने व रानडुकरांचा धुमाकुळ अधिक होऊन उभ्या ज्वारीचे मधुनच टुकडे पाडणे,कणसे चघळणे,भूईमुग उकरणे,हरभरा उपकरणे,मक्याची नासधुस करण्याचे प्रतिदिन प्रमाण वाढल्याने शेतकरी हैराण आहेत.त्यासाठी शेतकरी विविध उपाययोजना करत आहेत परंतु रानडुकरांचा प्रादुर्भाव कमी होत नसल्याने दुसाटच्याची पीके वाया जात आहेत.त्यामुळे शेतकरी हवालदिल होऊ लागल्याने प्रशासनाने यावर उपाय योजना करण्याची शेतकरी वर्गातून मागणी वाढत आहे.तसेच या पुर्वी देखील शिवश्री कृषि मंडळ हिवरसिंगा यांच्या वतीने अध्यक्ष यांनी मा.कृषिमंत्री श्री.धनंजय मुंडे यांची भेट घेऊन शेतक-यांच्या पीकांचे रानडुकरे,हरणे,व इतर प्राण्यापासुन संरक्षण करण्यासाठि अनुदानित सौरकुंपन,अथवा काटेरी कुंपण योजना राबवण्यासाठी विनंती केली होती.या नंतरच्या काळात देखील कृषिमंडळ या मागणीचा पाठपुरावा करून शेतक-यांच्या पीक संरक्षण करण्यासाठी तसेच चंदन,औषधी वनस्पती व इतर पीके नुकसान पातळी कमी होण्यासाठी प्रयत्न करणार आहे.तरी रब्बी हंगामी पीके धोक्यात आहेत परंतू या रांडुकरामुळे शेतक-यांवर देखील जीवितास धोका निर्माण होत आहे.शेतक-यांवर रात्रीचे राखणी करण्याचा त्रास वाढला आहे.रात्रीच्यावेळी शेतक-यांना समुहानेच फिरावे लागत आहे.अनेक ठिकाणी तात्पुरती तार लाऊन विद्युत करंट सोडण्याचे प्रमाण वाढल्याने देखील अपघाताचे प्रमाण वाढत आहे.करिता शेतकरी व त्यांचे रब्बी हंगामी पीके वाचवण्यासाठी प्रशासनाने डुकरांचा बंदोबस्त करणे आवश्यक आहे.असे शिवराम राऊत यांनी कळवले आहे.

## संपादकीय..

# जागरूकता पाळा पैसे सांभाळा!




आपल्याला सध्याच्या काळात बरेचदा ऑनलाईन आर्थिक व्यवहार करावे लागतात. अनेक मेसेज, मेल आपल्याला येत असतात. त्यात काही फसवणूक करणारे असू शकतात. काल असाच एक ईमेल आला आणि त्याला ई-ऋऊ जोडलेली होती. अगदी खरा वाटणारा हा मेल होता. सावधगिरी म्हणून मेल ओपन न करता बँकेत चौकशी केली तेव्हा त्यांनी सांगितले की, असा कुठलाही मेल आम्ही पाठवलेला नाही. त्याच आनुषंगाने सांगावेसे वाटते की, कधी बेसावधपणे आपण असा फसवा मेसेज किंवा मेल बघितला, ओपन केला आणि अकाउंटमधून क्षणार्धात पैसे गेले तरी घाबरून न जाता लगेच १९३० ह्या नंबरवर फोन केला पाहिजे. तसेच ु.लूलशीलीळाश.सीें.ळप ह्या संकेत स्थळावर जाऊन तक्रार नोंदवावी.

फसवणूक बहुतेक वेळा अनोळखी, बिन चेहऱ्याच्या माणसांकडून किंवा काही वेळा एखाद्या ओळखीच्या, भरवशाच्या माणसाकडूनही होऊ शकते. श्री. व सौ. गंगोपाध्याय हे हैदराबाद येथे राहणारे ज्येष्ठ नागरिक आहेत. त्यांचे स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये सेव्हिंग आणि मुदत ठेव खाते होते. ९ ऑगस्ट २०१७ रोजी सौ. गंगोपाध्याय ह्यांनी १५ लाखांच्या २ आणि १० लाखांची १ अशा ४० लाखांच्या मुदत ठेवी डइख हैदराबाद शाखेत उघडल्या. श्री. गंगोपाध्याय ह्यांनी जवळ जवळ २ वर्षांनी, ४ एप्रिल २०१९ ला बँकेकडून नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९ चे अकाउंट स्टेटमेंट घेतले. ते वाचून त्यांना जबरदस्त धक्का बसला कारण अकाउंटमध्ये २८ लाखांऐवजी ३ लाख रुपयेच शिल्लक होते. त्यांना असेही आढळले की हे पैसे इंटरनेट बँकिंगमार्फत वळवले गेले होते. पण आश्चर्य म्हणजे त्यांनी इंटरनेट सेवा मागितली नव्हती. त्यांनी तखएथ ONLY सेवा मागितली होती. मग हे कसे घडले असेल बरे ह्या विचारात ते पडले. नंतर लक्षात आले की, एका ओळखीच्या, विश्वासातल्या माणसाकडून त्यांची मोठी फसवणूक झाली होती. त्यांनी ५ दिवसांनी पोलिसात तक्रार केली आणि लगेच बँकेच्या शाखेत तक्रार केली. त्यांनी बँकेच्या असे निदर्शनात आणून दिले की ४० लाखांच्या ठेवी मुदत संपण्या अगोदर बंद करून सेव्हिंग खात्यात पैसे जमा केले गेले आणि या पैशातील फक्त ३ लाख रुपये शिल्लक राहिले आहेत. ह्यावर बँकेने असे सांगितले की, सौ. गंगोपाध्याय ह्यांच्या अकाऊंटची इंटरनेट बँकिंग सेवा अनधितकृतपणे वापरली गेली असण्याची शक्यता दिसते. इथे असे नमूद करावेसे वाटते की त्यांचे बँकेचे सर्व व्यवहार त्यांचा ड्रायव्हर करीत असे.

बँकेने काहीच मदत न केल्याने गंगोपाध्याय ह्यांनी राज्य आयोगाकडे तक्रार केली. नुकसानभरपाई म्हणून ६३ लाख, वार्षिक व्याज, मानसिक त्रासाबद्दल २५ लाख आणि कोर्टकचेरीच्या खर्चाबद्दल २० हजार रुपये मागितले. तक्रारीत त्यांनी ह्या गोष्टीवर भर दिला की खातेदार ज्येष्ठ नागरिक आहेत आणि TECH SAVVY नाहीत म्हणून सावधगिरीचा उपाय म्हणून त्यांनी view only पर्याय निवडला होता. बँकेने निष्काळजीपणे खातेदाराकडे चौकशी न करता ींळशु पश्रू पर्याय बदलून पैशाचे व्यवहार करण्याची परवानगी दिली. त्यामुळे ह्या नुकसानाला बँकच जबाबदार आहे. ह्यावर बँकेने सांगितले की खातेदाराने आपला मोबाईल, PIN नंबर, पासवर्ड आणि इतर माहिती ड्रायव्हरसारख्या जवळच्या माणसाला देणे हे चुकीचेच आहे. बँकेने पुढे असेही म्हटले की, हे सर्व ३७ वेळा केले गेलेले व्यवहार एकतर खातेदाराच्या संमतीने झालेले आहेत किंवा खातेदाराच्या निष्काळजीपणामुळे झालेले आहेत.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून राज्य आयोगाने गंगोपाध्याय ह्यांच्या बाजूने निर्णय दिला. आयोगाने स्टेट बँकेला असेही सांगितले की, ते ६३ लाखांच्या वसुलीसाठी ते फौजदारी न्यायालयात दावा दाखल करू शकतात. ह्यावर स्टेट बँकेने राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे वरील निर्णयाविरुद्ध अपील केले. त्यांनी असा युक्तिवाद केला की फसवणुकीच्या तक्रारी ह्या ग्राहक आयोगाकडे न करता दिवाणी न्यायालयात करायला हव्या होत्या. सायबर क्राइम आणि बँकिंग लोकपाल ह्यांनी गंगोपाध्याय ह्यांची तक्रार फेटाळून लावली होती याकडेही लक्ष वेधले. दुसरे असे की RBI च्या परिपत्रकानुसार ग्राहकाच्या निष्काळजीपणामुळे गेलेले पैसे वसूल करण्याची जबाबदारी बँकेची नाही. ह्यावर गंगोपाध्याय ह्यांच्या वकिलाने असे प्रतिपादन केलं की ह्या घटनेनंतर बँकेने इंटरनेट बँकिंगच्या प्रणालीत सुधारणा केली. फोनवरून कुठलाही बदल न करता खातेदाराने बँकेत प्रत्यक्ष येणे बंधनकारक केलं. ह्यावरून हे सिद्ध होते की, बँकेच्या प्रणालीत त्रुटी होत्या. हे सगळे ऐकून घेतल्यावर राष्ट्रीय आयोगाने असे म्हट्ले की, प्रणालीतल्या त्रुटींमुळेच त्यांचा ड्रायव्हर केवळ मोबाईल नंबर आणि अकाउंट नंबर एव्हढ्याच माहितीच्या आधारे "VIEW ONLY' पर्याया वरून पैसे काढण्याच्या परवानगी वर बदल करू शकला. सर्व गोष्टींचा विचार करून राष्ट्रीय आयोगाने स्टेट बँकेचे अपील फेटाळून लावले आणि राज्य आयोगाचा निर्णय कायम ठेवून गंगोपाध्याय ह्यांना नुकसानभरपाई देण्याचा आदेश दिला.

वरील केसमध्ये खातेदाराला नुकसानभरपाई मिळाली असा निर्णय झाला असला तरीही ग्राहक म्हणून आपण बँकेचे व्यवहार शक्यतो स्वतःच करावे, वेळोवेळी पासबुक अपडेट करावे, इंटरनेट बँकिंग सेवा घेतली असेल, तर अनोळखी फोन घेऊ नये, कुठलीही अनोळखी लिंक उघडू नये, ती असुरक्षित, फसवी असू शकते. आपला PIN/ CVV/ PASSWORD/ जढझ कोणालाही सांगू नये. खूप जास्त व्याज किंवा फायदा देऊ असे दाखविणाऱ्या भूलपाडू जाहिरातींना बळी पडू नये. एकच संदेश लक्षात ठेवावा 'जागरूकता पाळा-पैसे सांभाळा'.

# बेरोजगारी घटली,आता रोजगार वाढ हवी

महाराष्ट्रात अर्थमंत्री अजित पवार यांनी जाहीर केलेल्या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना जाहीर करण्यात आली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना अगोदरच जाहीर करण्यात आली असून त्यासाठी ४६ हजार कोटी रुपयांचा खर्च केला जाणार आहे. या योजनेचे ठिकठिकाणी कार्यक्रमही घेतले जात आहेत. लाडक्या बहिणींप्रमाणे लाडक्या भावांसाठी आम्ही बरेच काही करत आहोत, असा दावा महाराष्ट्रातील एकनाथ शिंदे सरकारने केला आहे. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेसाठी ५५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. कौशल्य विकास विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्षामार्फत ही योजना राबवली जात आहे. उमेदवार हा १८ ते ३५ वयोगटातील असावा, अशी गट आहे. अशा उमेदवारांना सहा महिन्यांचा प्रशिक्षण कालावधी मिळेल. दर वर्षी कार्य प्रशिक्षणाच्या दहा लाख संधी मिळणार आहेत. बारावी उत्तीर्ण असलेल्यांसाठी सहा हजार रुपये महिना, आयटीआय आणि पदविका उत्तीर्ण असलेल्यांकरिता आठ हजार रुपये तसेच पदवीधर आणि पदव्युत्तर शिक्षण उत्तीर्ण असलेल्यांसाठी दहा हजार रुपये दिले जातील. या प्रकारे उद्योगांसाठी कुशल मनुष्यबळ तयार केले जाणार आहे. इच्छुक उमेदवार आणि आस्थापनांनी त्यासाठी सरकारकडे ऑनलाइन नोंदणी करणे अपेक्षित आहे. देशात आणि राज्यात बेरोजगारीचे प्रमाण प्रचंड असून त्यामुळे या प्रकारच्या योजनांची आवश्यकता असल्याचे कोणीही नाकारणार नाही.



चालू आर्थिक वर्षात भारताचा आर्थिक विकास दर ७.२ टक्के असेल अशी अपेक्षा आहे. आगामी काही वर्षांमध्ये अर्थव्यवस्थेची गती अशीच कायम राहील, अशी आशा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने व्यक्त केली आहे; परंतु भारतात असंख्य तरुण-तरुणींनी उत्तम शिक्षण घेतलेले असून देखील नोकरी मिळत नाही. मुख्य म्हणजे क्वालिटी जॉब्स किंवा काही एक गुणवत्ता आणि कौशल्य आवश्यक असणाऱ्या नोकऱ्या कमी आहेत. नुकताच पीरिऑडिक लेबर फोर्स सर्वे प्रसिद्ध झाला असून त्यामधून या प्रश्नावर प्रकाश पडला आहे. समग्र पातळीवर विचार केला असता लक्षात येते की २०१७-१८ मध्ये लेबर फोर्स पार्टिसिपेशन रेट म्हणजेच काम मिळण्याचे ४९ टक्के इतके प्रमाण २०२३-२४ पर्यंत ६० टक्क्यांवर आले आहे. ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे; परंतु एवढी वाढ होण्याचे कारण काय? तर शहरांमध्ये आणि मुख्य म्हणजे ग्रामीण भागात कामामधील महिलांच्या सहभागाचे प्रमाण २४ टक्क्यांवरून ४७ टक्क्यांवर गेले आहे. स्त्रियांचा अर्थव्यवस्थेतील सहभाग वाढत असल्यास ही स्वागताचीच बाब आहे; परंतु थोडे खोलात गेल्यास लक्षात येईल की, लाखो कुटुंबांची अवस्था इतकी बिकट असते की, घरउत्पन्नात हातभार लावण्यासाठी या स्त्रियांना घरकाम करून, शिवाय छोटी-छोटी कामेही करावी लागत आहेत. अन्यथा, त्यांची गुजराण होणे अशक्य. यापैकी बहुतेक महिला स्वयंरोजगार क्षेत्रातच आहेत.

गेल्या सहा वर्षांमध्ये स्वयंरोजगार करून पोट भरणाऱ्या महिलांचे प्रमाण ५२ टक्क्यांवरून ६७ टक्क्यांवर गेले आहे. यापैकी काही महिला या स्टॉलवर बसून विक्री करतात किंवा हातगाड्यांवर भाजी वगैरे विकतात. अशाच प्रकारे अन्य लहान-सहान कामे करतात. काही महिला आपल्याच मुलाच्या अथवा नवऱ्याच्या दुकानात हातभार लावण्यासाठी बसतात किंवा स्वतःच्या छोट्या शेतात काम करतात. त्यासाठी त्यांना कोणताही पगार मिळत नाही. दुसरे म्हणजे, मोठ्या प्रमाणातील मजूर हे अनौपचारिक क्षेत्रात काम करणारे आहेत. २०२३-२४ मध्ये प्रोप्रायटरी किंवा पार्टनरशिपमधील छोट्या, छोट्या व्यवसाय-उद्योगात काम करणाऱ्या कामगारांची संख्या एकूण संख्येच्या ७३ टक्के इतकी होती. २०१७-१८ मध्ये हे प्रमाण ६८ टक्के इतके होते. शिवाय उत्पादन क्षेत्रातील रोजगार वाढलेला नाही. तो कुंठितावस्थेत आहे. उलट, कृषी क्षेत्रातील रोजगार हळूहळू वाढत आहे.


कृषी क्षेत्रातून मिळणारे उत्पन्न कमी आणि तरीही तिथेच अधिकाधिक प्रमाणात रोजगार वाढत असल्यास, ती चिंतेची बाब मानावी लागेल. कृषीक्षेत्रात सहा वर्षांपूर्वी ४४ टक्के लोक काम करत होते. आता हे प्रमाण ४६ टक्क्यांवर गेले आहे, तर कारखानदारी किंवा उत्पादन क्षेत्रातील २०२१-२२ मधील ११.६ टक्के रोजगार २०२३-२४ मध्ये ११.४ टक्क्यांवर आला आहे. देशातील बेरोजगारीचे प्रमाण २०१७-१८ मध्ये सहा टक्के होते. ते आता ३.२ टक्क्यांवर आले आहे, ही चांगली बाब आहे. तसेच युवकांमधील बेरोजगारीचे प्रमाण याच काळात १७ टक्क्यांवरून दहा टक्क्यांवर आले आहे. तरीदेखील दहा टक्के हे प्रमाणही जास्तच आहे. शिवाय उच्च शिक्षितांमधील बेरोजगारीचे प्रमाण खूप आहे. भारतात अधिकाधिक उत्पादक स्वरूपाच्या, गुणवत्तापूर्ण आणि चांगले वेतन देणाऱ्या रोजगारांच्या संधींची आवश्यकता आहे. भांडवलसघन, स्वयंचलित उत्पादनपद्धती आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वाढता वापर यामुळे रोजगारनिर्मितीचे मोठे आव्हान देशासमोर आहे.

'सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी' (सीएमआयई) या स्वतंत्र 'थिंक टँक'च्या आकडेवारीनुसार जून २०२४ मध्ये भारतातील बेरोजगारीचा दर ९.२ टक्के होता, मे २०२४ मधील सात टक्क्यांवरून त्यात वाढ झाली आहे. 'सीएमआयई'चा कंझ्युमर पिरॅमिड्स हाऊसहोल्ड सर्व्हे दर्शवतो की जून २०२४ मध्ये महिला बेरोजगारी १८.५ टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे, जी राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त आहे. मागील वर्षी याच कालावधीतील १५.१ टक्क्यांपेक्षा ही वाढ जास्त आहे. त्याच वेळी, पुरुष बेरोजगारी ७.८ टक्के होती. जून २०२३ मधील ७.७ टक्क्यांपेक्षा ती किंचित जास्त आहे. कामगार सहभाग दर (एलपीआर) जून २०२४ मध्ये ४१.४ टक्क्यांपर्यंत वाढला. जून २०२३ मध्ये तो ३९.९ टक्के होता. ग्रामीण बेरोजगारीचा दर मे महिन्यातील ६.३ टक्क्यांवरून जूनमध्ये ९.३ टक्के झाला. शहरी बेरोजगारीचा दर ८.६ टक्क्यांवरून ८.९ टक्क्यांवर पोहोचला आहे. 'एलपीआर'हे काम करणाऱ्या किंवा काम करण्यास इच्छुक असलेल्या आणि एकूण काम करणाऱ्या वयोगटातील लोकसंख्येमध्ये लोकांपासून बनलेले असते. कामगारांची मागणी आणि रोजगार दरांमधील या बदलत्या कलांमुळे प्रचलित आर्थिक आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि ग्रामीण आणि शहरी भागात शाश्वत वाढ सुनिश्चित करण्यासाठी विचारशील धोरणात्मक उपायांची आवश्यकता आहे. हे प्रमाण रोजगाराच्या जास्त संधी निर्माण करण्यासाठी आणि देशाची आर्थिक लवचिकता वाढवण्यासाठी आर्थिक क्रियाकलापांमध्ये विविधता आणण्याचे महत्त्व अधोरेखित करते.

आजच्या जागतिक स्पर्धेत देशाचे अस्तित्व टिकवायचे असेल आणि अर्थव्यवस्थेचा पाया अधिक रुंद आणि खोल करायचा असेल, तर फक्त सरकारी भांडवलावर अवलंबून राहता येत नाही. म्हणून सरकारी उद्योगांचे खासगीकरण आणि खासगी क्षेत्राला प्रोत्साहन देणे अत्यंत गरजेचे होते आणि आजची ती गरज आहे. सार्वजनिक क्षेत्रात एखादा उद्योग करण्यासाठी शंभर माणसांना रोजगार दिला जात असेल आणि तेच काम खासगी क्षेत्राकडे देण्यात आल्यास फार कमी माणसांमध्ये केले जाते. कामाचा दर्जाही अधिक चांगला असतो आणि अधिक कामही केले जाते; पण यामुळे काही जणांचा रोजगार मात्र जातो हे सत्य आहे. यांत्रिकीकरण ही फक्त भांडवलशहांची नव्हे, तर काळाची गरज आहे. जागतिक स्पर्धेत टिकायचे असेल तर वस्तू आणि सेवांचा दर्जा फार महत्त्वाचा आहे. त्यामुळे आजच्या जगात यांत्रिकीकरणाला पर्याय नाही; परंतु एक स्वयंचलित यंत्र आणले जाते, तेव्हा अनेक माणसांचा रोजगार जातो. यंत्र चालवण्यासाठी आवश्यक ते शिक्षण आणि कौशल्य असलेल्यांना नोकरी मिळते; पण शिक्षण किंवा कौशल्य नसणाऱ्यांचा रोजगार जातो. त्यांच्यासाठी नव्याने रोजगार निर्माण होण्याचे प्रमाण कमी होते किंवा त्यांना अपेक्षित रोजगार मिळत नाही. आता तरुणांच्या हाताला काम नाही आणि उद्योगपती म्हणतात, त्यांना अपेक्षित मनुष्यबळ मिळत नाही. या दोन्ही गोष्टी एकाच वेळी खऱ्या असतील, तर त्याचा सोपा अर्थ आहे की तरुणांनी फक्त पदव्यांचे कागद मिळवले आहेत आणि खऱ्या अर्थाने रोजगाराभिमुख शिक्षण घेतलेले नाही. शिक्षण प्रक्रियेतील ही त्रुटी दूर करण्याचे आव्हान देशासमोर आहे.

# बालकांमधील कुपोषण निर्मूलनासाठी पूरक आहार हीच गुरुकिल्ली

सप्टेंबरमध्ये, भारताने ७वा राष्ट्रीय पोषण महिना २०२४ साजरा केला, हा महिना पोषणविषयक जनजागृती आणि उपाययोजनांसाठी समर्पित आहे. हा एक असा पैलू आहे जो अतिशय महत्त्वाच्या पूरक आहारावर सामूहिक भर देण्याची गरज अधोरेखित करतो. अर्भकांना संपूर्ण स्तनपानापासून घन आणि अर्ध-घन पदार्थांचा समावेश असलेल्या आहाराकडे नेणारे हे संक्रमण भारतात सातत्याने आढळणाऱ्या कुपोषणाच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी एक मूलभूत उपाय आहे. पूरक आहार हा विषय केवळ अन्नापुरता मर्यादित नाही; बालकांना योग्य वेळी योग्य पोषक तत्त्वे मिळतील हे सुनिश्चित करण्याशी संबंधित आहे ज्यामुळे निरोगी आणि उत्पादक जीवनाचा पाया घातला जाईल. केवळ दूध, वाढत्या वयातील बालकांच्या पोषणविषयक गरजा पूर्ण करू शकत नसल्यामुळे, जागतिक आरोग्य संघटना ६ महिन्यांच्या वयापासून पुरेशी पोषणमूल्ये असलेले आणि सुरक्षित असलेले पूरक अन्न, २ वर्षे किंवा त्यापुढील वयापर्यंत स्तनपान सुरू ठेवण्याची शिफारस करते. मेंदूचे कार्य, शारीरिक वाढ आणि प्रतिकारशक्तीच्या विकासामध्ये पूरक आहाराची प्रमुख भूमिका असल्याने पूरक आहार अतिशय महत्त्वाचा आहे. मेंदूच्या विकासाविषयीच्या शास्त्रीय पुराव्यांवरून असे दिसून येते की, जन्मानंतर दोन वर्षांच्या आत, मेंदूचे आकारमान १००% पेक्षा जास्त वाढते, जे प्रामुख्याने मेंदूमधील ग्रे मॅटरच्या विकासामुळे होत असते.



त्याच प्रकारे बाळाच्या जन्मानंतर पहिल्या वर्षात त्याचे वजन जवळपास तिप्पट होते. म्हणूनच, पूरक आहार हा केवळ मेंदूच्या विकासासाठीच आवश्यक नाही तर बालकांचे कुपोषण रोखण्यासाठी देखील गरजेचा आहे, कुपोषणाचा हा परिणाम भारतातील पाच वर्षांखालील जवळजवळ एक तृतीयांश बालकांध्ये दिसून येतो. बालकांमधील कुपोषणामुळे खुजेपणा, वेस्टिंग आणि अंडरवेट अशी लक्षणे दिसून येतात, ज्यामुळे वाढत्या वयातील बालकांच्या शारीरिक आणि मानसिक विकासावर विपरित परिणाम होतात. याचे उदाहरण म्हणजे संशोधनातून असे दिसून आले आहे की, 'स्टंटेड' बालकांना परीक्षेत कमी गुण मिळण्याची शक्यता जास्त असते, त्यांची आकलन क्षमता कमी असू शकते आणि त्यामुळे पुढच्या आयुष्यात आर्थिक उत्पादकता देखील कमी होऊ शकते. अतिशय उत्तम रोगप्रतिकारक्षमता निर्माण करण्यासाठी देखील पूरक आहार महत्त्वाचा असतो. अतिसार, श्वसनविकार आणि अन्नविषयक ॲलर्जी या समस्या अशा बालकांमध्ये नेहमी दिसून येतात. बालकांच्या आयुष्यातील पहिली दोन वर्षे अतिशय महत्त्वाचा कालखंड म्हणावा लागेल ज्यामध्ये योग्य प्रकारचे पोषण आपल्या भावी पिढ्यांची शारीरिक वाढ, आकलन क्षमता आणि प्रतिकार क्षमता लक्षणीय प्रमाणात वाढवू शकते. अतिशय जास्त महत्त्वाचा असा हा कालखंड आहे ज्यामध्ये भरपूर प्रमाणात जीवनसत्त्वे असलेली फळे आणि भाज्या, कडधान्ये, शेंगावर्गातील भाज्या, अंडी आणि दुग्धजन्य पदार्थ यांचा समावेश बालकांच्या आहारात असला तर त्यामुळे बालकांचे आरोग्य दीर्घ काळ टिकून राहण्यास मदत होते. यामुळे एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाला आहे. भारतातील अगदी लहान बालकांच्या आहारात पूरक आहाराचा समावेश वाढवण्यासाठी कोणती पावले उचलली जाऊ शकतात?

पूरक आहाराचा योग्य प्रकारे समावेश करण्यात यश मिळवण्यासाठी सर्वप्रथम निरोगी आणि पोषणमूल्ये असलेल्या अन्नाचा समावेश विशेषतः सहा महिने ते दोन वर्षे या वयामध्ये असा आहार समाविष्ट झाला पाहिजे. भारताच्या समृद्ध पाकशास्त्रामध्ये असे अनेक पदार्थ आहेत जे पोषणमूल्यांनी समृद्ध आहेत आणि लहान बालकांसाठी उत्तम आहेत. खिचडी आणि दलिया यांसारख्या पारंपरिक पाककृती केवळ तयार करायलाच सोप्या नाहीत, तर आवश्यक पोषक तत्त्वांनी देखील परिपूर्ण आहेत. उदाहरणार्थ, नाचणी आणि केळीची लापशी लोह आणि कॅल्शियमचा उत्कृष्ट स्रोत आहे, तर बाजरीची खिचडी जीवनसत्त्वे आणि खनिजे यांचे उत्तम मिश्रण आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्रालयाच्या मिशन पोषण २.० च्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये आहारातील विविधता आणि ताजी फळे, भाज्या, भरड धान्ये आणि स्थानिक पातळीवर उपलब्ध, पौष्टिक आणि प्रादेशिक परिस्थितीला अनुकूल असलेल्या परिपूर्ण अन्नपदार्थांच्या वापरावर मोठा भर देण्यात आला आहे. या मार्गदर्शक तत्त्वांवर आधारित, स्थानिक पातळीवर उपलब्ध आणि परवडणाऱ्या घटकांपासून बनवलेल्या पारंपरिक खाद्यपदार्थांचे पुनरुज्जीवन केल्याने बालकांना त्यांच्या वाढीला आणि विकासाला मदत करणारा संतुलित आहार मिळेल हे सुनिश्चित होत आहे.दुसरे, म्हणजे सामाजिक आणि वर्तवणुकीतील बदलांना चालना देण्यासाठी शास्त्रीय संदेश प्रसारित करण्यासाठी सांस्कृतिक मंचांचा वापर करणे हे देखील एक महत्त्वाचे प्रमुख धोरण ठरू शकते. विशेषतः जन्माच्या सहा महिन्यांनंतर पूरक आहार सुरू करण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेने शिफारस केलेली वेळ, भारतीय सांस्कृतिक संदर्भांमध्ये अतिशय महत्त्वाचा टप्पा मानल्या गेलेल्या 'अन्नप्राशन' या पारंपरिक प्रथेशी उत्तम प्रकारे जुळत आहे. पूरक आहाराचे महत्त्व ओळखून, केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्रालय, माता आणि स्थानिक समुदायांना बालकांच्या आहारात वैविध्यपूर्ण आणि पौष्टिक-समृद्ध अन्नाचा परिचय करून देण्याचे महत्त्व देशभरातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी सांगावे यासाठी समुदाय-आधारित कार्यक्रम म्हणून अन्नप्राशन दिवस साजरा करण्यास प्रोत्साहन देते. अर्भके आणि बालकांना आहार देण्याच्या शास्त्रीय संशोधनात सिद्ध झालेल्या निष्कर्षावर आधारित पद्धतींचा अंगीकार करण्यासाठी आणि त्यांचा अधिकाधिक प्रसार करण्यासाठी पारंपरिक विद्वत्ता आणि सामाजिक-सांस्कृतीक पद्धतींचा अवलंब एक उत्तम कार्यक्रम ठरू लागला आहे.सरतेशेवटी, पूरक आहार हा ७ व्या पोषण माह २०२४चा एक महत्त्वाचा भाग होता, जो केंद्रीय माता आणि बाल पोषणाच्या सर्वात दुर्लक्षित पैलूंपैकी एक आहे. शास्त्रीय निष्कर्षांवर आधारित पद्धतींचा प्रचार करून, अन्नप्राशनसारख्या सांस्कृतिक परंपरांचा लाभ घेऊन, परवडणाऱ्या आणि स्थानिक पातळीवर उपलब्ध खाद्यपदार्थांच्या पाककृतींचा प्रसार करून आणि बालकांचे अनारोग्यदायी खाद्यपदार्थांपासून संरक्षण करून, भारत कुपोषण निर्मूलनासाठी आपल्या प्राधान्यक्रमाच्या उद्दिष्टांच्या दिशेने लक्षणीय टप्पे गाठू शकतो. लोकचळवळ किंवा समुदायांची एकजूट यांच्या जोडीने होत असलेले सरकारचे हे प्रयत्न, सर्वांगीण प्रगती होण्यासाठी आवश्यक असलेले पोषण सर्व बालकांना उपलब्ध होईल आणि त्यायोगे देशाच्या निरोगी भविष्याचा पाया घातला जाईल, हे सुनिश्चित करतील.

# अखेर अनाधिकृत बॅनर प्रकरणी बीड नगरपालिके कडुन २१ जणांविरोधात गुन्हा दाखल;कारवाईत सातत्य हवे-डॉ.ढवळे

**बीड (प्रतिनिधी):** बीड शहरात राजकीय नेते, कार्यकर्ते, व्यावसायिक आदिंनी आपापल्या वेगवेगळ्या जाहिरातीचे अनाधिकृत बॅनर लावून सुंदर शहराला विद्रूप केले होते.तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौकात लावण्यात आलेल्या बॅनर मुळे वाहतुकीस अडथळा व अपघाताच्या घटना घडलेल्या आहेत. याविरोधात शहर विद्रुपीकरण कायद्यांतर्गत कारवाई करण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी सहका-यांसमवेत दि.२ डिसेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौकात निदर्शने केली होती. मागील काही वर्षांपासून शहरात विनापरवाना बॅनर लावण्याचा पायंडाच पडला होता. नेत्यांच्या निवडी, शहरात स्वागत ,उत्सव, वाढदिवस आदी कार्यक्रमांच्या शुभेच्छांचे बॅनर लावले जात होते. अनाधिकृत बॅनर हटवावेत यासाठी सामाजिक कार्यकर्ते वारंवार निवेदने आणि आंदोलनाच्या माध्यमातून नगरपालिका प्रशासनाकडे कारवाईची मागणी करत होते.परंतु ठोस कारवाई करण्यात येत नसे आंदोलनानंतर बॅनर काढण्याचे नाटक करण्यात येई आणि दुस-या दिवशी पुन्हा बॅनर लावलेले दिसत असत.अखेर नगर पालिकेने कठोर पावले उचलत दि.१२ गुरूवार रोजी एकाच दिवशी ३ पोलिस ठाण्यात तब्बल २१ जणांविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

स्वच्छता निरीक्षक शशिकांत जोगदंड यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलिस ठाण्यात सुदर्शन सुभाष बांगर,उमेश शहादेव फड,यादव चव्हाण, संकेत जाधव,सुमित उजगरे, जालिंदर हिरवे,दिपक चांदणे यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.सुनिल काळकुटे यांच्या फिर्यादीवरून पेठ बीड पोलिस ठाण्यात संकेत जाधव,रोहन गायकवाड, विलास जोगदंड यांच्या विरोधात तर भागवत जाधव यांच्या फिर्यादीवरून संकेत जाधव,दत्ता पगळ,अक्षय चांदणे, सुमित उजगरे,पंकज खुपसे,अक्षय चांदणे,अजय सुरवसे, राहुल इंगळे, जालिंदर हिरवे,दीपक चांदणे बीड शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.विना परवाना बॅनर लाऊ नये असे आवाहन करण्यात आले होते.पहिल्यांदा बॅनर जप्तीची कारवाई करण्यात आली होती.परंतु त्यानंतरही काही लोकांनी विना परवाना बॅनर लाऊन शहराचे विद्रुपीकरण करणे सुरूच ठेवले होते.त्यामुळे सर्व स्वच्छता निरीक्षकांना सुचना करून गुन्हे दाखल करण्याच्या सुचना दिल्या.नागरीकांनी सहकार्य करावे असे आवाहन निता अंधारे मुख्याधिकारी नगरपरीषद बीड यांनी केले आहे.राजकीय नेते आणि कार्यकर्ते यांना आवाहन करण्यात येत असुन निदान छत्रपती शिवाजी महाराज चौकातील वाहतूकीस अडथळा असणारे व अपघाताला निमंत्रण ठरणारे बॅनर लाऊ नयेत तशा सुचना सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांना द्याव्यात असे आवाहन डॉ.गणेश ढवळे यांनी केले असुन बीड नगर परिषदेनेही कोणताही दुजाभाव न करता कारवाईत सातत्य ठेवावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.




# शिवसेना जिल्हाप्रमुख मुळूक,गलधर यांनी केले देशमुख कुटुंबीयांचे सांत्वन

## स्व.संतोष देशमुख कुटुंबीयांच्या लढाईत शिवसेना कायम सोबत-मुळूक,गलधर

**बीड (प्रतिनिधी):** केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून अत्यंत निर्दयीपणे हत्या केल्याची दुर्दैवी घटना चार दिवसांपूर्वी घडली. या घटनेचे बीड जिल्ह्यातच नाही तर राज्यभर पडसाद उमटले. जिल्ह्यातील जनतेने या घटनेचा तीव्र निषेध केला. दरम्यान शनिवारी (दि.१४) शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्निल गलधर यांनी मस्साजोग येथे संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. देशमुख कुटुंबियांच्या लढाईत शिवसेना कायम सोबत असल्याचे सांगून जिल्हाप्रमुख सचिन मुळूक आणि स्वप्निल गलधर यांनी देशमुख कुटुंबियांचे सांत्वन केले.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे सोमवारी दुपारी अपहरण करुन हत्या करण्यात आली. घटनेनंतर देशमुख यांच्या हत्येचे जिल्हयात तीव्र पडसाद उमटले. या प्रकरणातील आरोपींच्या अटकेसाठी नऊ तास रास्तारोको करण्यात आला. मानवी संवेदना हेलावून टाकणाऱ्या



या घटनेचा विविध स्तरातून तीव्र निषेध करण्यात आला. दरम्यान शनिवारी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक आणि स्वप्निल गलधर यांच्यासह शिवसैनिकांनी मस्साजोग येथे जाऊन देशमुख कुटुंबियांची भेट घेतली. यावेळी सरपंच स्वर्गीय संतोष देशमुख यांना श्रद्धांजली वाहिली. त्यांचे बंधू धनंजय देशमुख यांची भेट घेऊन देशमुख कुटुंबिया सोबत शिवसेना कायम सोबत असल्याचे सांगितले. शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे या खून प्रकरणाचा तपास सीआयीडी मार्फत करावा अशी मागणी केली होती त्यानुसार या प्रकरणाचा तपास सीआयडी कडे देण्यात आला आहे स्वतः उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणात लक्ष घातल्याचे मुळुक यांनी यावेळी सांगितले.

यावेळी केज युवा सेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे, शिवसेना तालुकाप्रमुख अण्णासाहेब पाटील, विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाने, शहर प्रमुख बाळासाहेब पवार, युवा सेना तालुकाप्रमुख सुग्रीव सक्राते, विकास काशीद केज तालुका सचिव, उपतालुकाप्रमुख महेंद्र चाटे, चंद्रकांत इंगळे, विभाग प्रमुख दत्ता काकडे, युवासेना शहरप्रमुख आकाश चाळक, विभाग प्रमुख आकाश बहीर, शिवाजी गायकवाड, युवासेना उपतालुकाप्रमुख अजित गोरे, सरपंच बनसारोळा मनोहर गोरे सह शिवसेनेचे सर्व पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# शैक्षणिक वर्षाच्या अनुषंगाने एक वर्ष कार्यकाळ वाढवावा

## मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजने अंतर्गत ट्रेनी शिक्षक (शिकाऊ) यांचे गटशिक्षणाधिकाऱ्याला निवेदन

**माजलगाव (प्रतिनिधी):** मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजने अंतर्गत कार्यरत (ट्रेनर शिक्षक) हे शासन निर्णयाच्या आधिन राहून, शासन निर्णयाच्या शैक्षणिक अर्हतेनुसार पात्र व पुर्ण वेळ नियुक्त शाळेवर कार्यरत असून, शैक्षणिक वर्षाच्या अनुषंगाने सहा महिन्याचे प्रशिक्षण हे अपुर्ण व अर्धवट होईल. करिता किमान शैक्षणिक वर्ष पुर्ण करण्याची बाब विचाराधीन ठेवून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान व ट्रेनी (शिकाऊ) शिक्षक यांचे प्रशिक्षण किमान पुर्ण होण्याच्या अनुषंगाने विचार करून आपण ट्रेनी शिक्षक यांना सदरील नियुक्ती शाळेवर किमान एक वर्ष (१२ महिने) प्रशिक्षण मिळावे या मागणीसाठी दि .१२ दिसेबर रोजी माजलगाव गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी यांना निवेदन देण्यात आले.

सदरील विषयाचा गांभिर्यपुर्वक विचार करून ट्रेनी शिक्षक यांना नियुक्ती शाळेवर शैक्षणिक वर्षाच्या अनुषंगाने किमान एक वर्ष (१२ महिने ) एवढा कार्यकाळ वाढवून देण्यात यावा . सदरील विषयावर लक्ष केंद्रीत करून न्यायाची भुमिका घेत किमान एक वर्ष कार्यकाळ वाढवून देण्यात यावा व जलद गतीने कार्यवाही करण्यात यावी हि मागणी या वेळी उपस्थित युवा प्रशिक्षणार्थी (ट्रेनिंग शिक्षक) यांच्यावतीने करण्यात आली. यावेळी झालेल्या छोट्या खाणी झालेल्या बैठकीत गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी व श्री. पोटभरे यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. व आपल्या मागण्या शासन दरबारी मांडून आपल्याला न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही पण प्रयत्नशील आहोत याची ग्वाही दिली.यावेळी दळवी गोविंद , घडसिंगे अनंत , हिवाळे मुकुंद , राठोड विशाल ,पवार शरद, थोरात भिम , टाकणखार सुमित,पट्टेकर अनिकेत, भालेकर आकाश, खुने प्रशांत, सय्यद नईम, जाधव निलेश यांच्यासह महिलांची उपस्थिती ही लक्षणीय होती. यावेळी कांबळे शिल्पा ,उघडे सिमा, सावंत पुजा, वाघमारे अर्चना,शिंदे पुजा, जाधव कोमल, ऊखंडे अमृता, टाकणखार किर्ती, शिंदे विद्या, होके अन्विता, यांच्यासह अनेक युवा प्रशिक्षणार्थी ( ट्रेनी शिक्षक) उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना भीमराव आप्पा टाकणखर, दत्ताभाऊ कांबळे, पत्रकार मच्छिंद्र भाऊ उफाडे यांचे विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

# महात्मा फुले यांच्या नावाची कमान पूर्ववत लावण्याची मागणी

**अंबाजोगाई (प्रतिनिधी):** अंबाजोगाई शहरातील अतिशय जुनी अशी महात्मा ज्योतिबा फुले भाजी मंडई ही सर्वदूर परिचित आहे. त्या भाजी मंडईत अंबाजोगाई तालुक्यातील सर्व शेतकरी आपला भाजीपाला विक्रीसाठी घेऊन येतात. या भाजी मंडई मध्ये येण्यासाठी प्रवेशद्वारावर महात्मा फुले भाजी मंडई नामक फलक असलेली कमान होती . मात्र शहरातील विकास कामाच्या नावाखाली सदरील कमान काढून टाकण्यात आले आहे. काढण्यात आलेली ती कमान पुन्हा उभा करावी या मागणीचे निवेदन मुख्याध्याकारी नगर परिषद अंबाजोगाई यांच्याकडे महात्मा फुले सेवा संघाच्या वतीने देण्यात आले आहे.

निवेदनात दिलेली याबाबत सविस्तर माहिती अशी की , निवेदनात सर्वप्रथम मनोहर अंबा नगरीत रस्ते व इतर कामाच्या स्वरूपाने जी काही विकास कामे झाली आहेत व होऊ पाहत आहेत . त्यामुळे नक्कीच अंबानगरीच्या वैभवात भरच पडत आहे त्याबद्दल अंबाजोगाई नगर परिषदेचे अभिनंदन केले आहे. अंबाजोगाई शहरातील भाजी मंडई



भागात विकास काम (पाटील चौक ते श्री योगेश्वरी देवी मंदिर सिमेंट मार्ग) दरम्यान, महात्मा फुले भाजी मंडई, अंबाजोगाईची प्रवेश कमान काढण्यात आली होती, ती प्रवेश कमान लवकरात लवकर पूर्णवत लावावी /बसवावी अशी विनंती महात्मा फुले सेवा संघाच्या वतीने मुख्याधिकारी नगर परिषद अंबाजोगाई यांच्याकडे केली आहे. अंबाजोगाई नगर परिषदेत देण्यात आलेल्या निवेदनावर शरद पांडुरंग माळी , गणेश मूकुंदराव जाधव,गणेश सुंदर आठाव,महेश दादाराव सपाटे,गजानन जगन्नाथ घोडके, प्रथमेश रमाकांत देशमाने, नितीन रामराव जिरे, बालासाहेब काशीनाथराव मसने, ऋषिकेश शिवाजीराव पाथरकर, दिनेश अशोकराव घोडके, अशोक गणपतराव बलुतकर, राम वसंतराव घोडके, वसंत दत्तात्रय घोडके,दत्ता नामदेव राऊत , पंकज गणेश राऊत,बलूतकर नंदकुमार मधुकर ,जिरे अमोल बालासाहेब, पवन प्रकाशराव जिरे, अमोल नागोराव धोडके राम मुकूंद, विशाल वैजनाथ कंठीकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# बीड जिल्ह्यातील फायनान्स कंपन्यांची 'सावकारी'-वाकसे

**वडवणी (प्रतिनिधी):** जिल्ह्यात १० हून अधिक वित्त सहाय्य करणाऱ्या मायक्रो फायनान्स कंपन्या असून त्यांचे जाळे दिवसेंदिवस घट्ट होत चालले आहेत. अल्प व्याजाच्या नावाखाली महिलांना कर्ज देवून जणु एक प्रकारे सावकारीच सुरू झाली आहे. प्रत्येक कंपन्यांची उलाढाल कोट्यवधीचा घरात पोहोचली आहे. परिणामी आजघडीला बीड जिल्ह्यातील जवळपास ७० टक्के कुटूंबातील महिला कर्जाच्या गळाला लागल्या आहेत. या वाढत्या सावकारीच्या जाळ्याकडे वेळीच लक्ष घालण्याची गरज असल्याची प्रतिक्रिया शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे व्हाईस प्रसिडेंट दत्ता वाकसे व्यक्त केली आहे बीड जिल्ह्यात मायक्रो फायनान्स कंपन्यांचे जाळे दिवसेंदिवस घट्ट होत चालले आहेत. महिलांचे गट तयार करणे, गटांना सोयीस्कर पध्दतीने कर्ज उपलब्ध करून देणे व दिलेल्या कर्जाची महिन्यापोटी वसुली करणे हे मायक्रो फायनान्स कंपन्यांची कामे जोमात सुरू आहेत. कर्ज देणे आणि वसुली करणे यासाठी तरूण-तरुणींना कामावर ठेवण्यात आले आहे. जवळपास ५०० हून अधिक तरूण-तरूणींना या मायक्रो फायनान्स कंपनीकडून रोजगार उपलब्ध झाले असले तरी त्या कर्मचाऱ्यांचे वेतन बीड जिल्ह्यातील महिलांकडून व्याजाच्या स्वरूपात वसुल केले जात आहे. मायक्रो फायनान्सचे हे अर्थसहाय्य सावकारीचे स्वरूप घेत चालले आहे. एखाद्या कर्जदार महिलेने वेळेवर कर्जाचा हप्ता भरला नाही तर तिला अपमानस्पद वागणुकीलाही समोर जावे लागत आहे. अवाजवीय व्याज आकारणी करून वसुली होत असतानाही कर्जाच्या डोंगराखाली सापडलेल्या महिला या संदर्भात समस्या मांडू शकत नाहीत. प्रत्येक कुटूंब कर्जाच्या डोंगराखाली सापडला आहे.रिजर्व्ह बँकेने खासगी फायनान्स कंपन्यांना नियमावली ठरवून दिली आहे. तरीही अत्यल्प व्याज आकारणी केली जात आहे, असे सांगून त्या आड खासगी कंपन्या मनमानीपणे व्याज आकारून वसुली करीत आहेत. व्याजावर व्याज लावण्याचा धडाका देखील सुरू करण्यात आला आहे. नियमानुसार किती व्याज आकारण्यात आला, हे सांगणे आवश्यक असतानाही कर्ज दिल्यानंतर किंबहुना कर्जदाराकडून अर्जावर स्वाक्षरी घेतल्यानंतर नविन नियम लावले जात आहेत. बहुतांश कंपन्यांकडून प्रत्यक्ष व्यवहार होताना नियम-अटी, शर्ती पाळल्या जात नाहीत, हे वास्तव्य सर्वश्रुत असूनही या प्रकारावर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा मात्र डोळ्यावर पट्टी बांधून कंपन्यांच्या सावकारीला खतपाणी घालत आहे. त्यामुळे शासन प्रशासन जिल्हाधिकारी यांनी विशेष लक्ष घालून अशा कंपन्यावर कारवाई करावी अशी मागणी शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे व्हाईस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी केले आहे



## आ.छगनराव भुजबळ यांना मंत्रिमंडळातून डावलून

# महायुती सरकारने केला देशातील संपूर्ण ओबीसी समाजाचा अपमान-सुभाष राऊत

## बीडमध्ये महात्मा फुले पुतळ्याजवळ समता परिषदेचे काळ्या फिती बांधून निषेध आंदोलन

**बीड | प्रतिनिधी**

ओबीसी समाज हा भाजपाचा डीएनए आहे असे म्हणणारे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस आणि ज्यांना छगनराव भुजबळ यांच्या नेतृत्वामुळे राज्यात सर्वाधिक जागा निवडून आणता आल्या, ते राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार यांनी देशातील तमाम ओबीसी समाजाचा बुलंद आवाज असलेल्या कणखर नेतृत्वाला राज्य मंत्रिमंडळातून डावलून देशातील ओबीसी समाजाचा अपमान केला आहे.

ज्या ओबीसी समाजामुळे राज्यात महायुती सरकार आले, त्या ओबीसी समाजावरील हा मोठा अन्याय असून छगनराव भुजबळ यांच्या पाठीशी उभा असलेला ओबीसी समाजाचा अवमान केल्याबद्दल बीड शहरात समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष ड. सुभाष राऊत यांच्या नेतृत्वाखाली समता परिषदेच्या वतीने काळ्या फिती बांधून भव्य धरणे आंदोलन करण्यात आले आणि महायुती सरकार व अजित पवार यांचा निषेध व्यक्त करण्यात आला. नुकतेच मंत्रिमंडळाची यादी जाहीर झाली असून, त्यामध्ये ओबीसी समाजाचा बुलंद आवाज असलेल्या आ. छगनराव भुजबळ यांना मंत्रिमंडळातून डावलण्यात आले. यावर प्रतिक्रिया व्यक्त करताना ड. सुभाष राऊत म्हणाले की, छगनराव भुजबळ यांच्यामुळे राज्यातील तमाम ओबीसी समाज महायुती सरकारच्या पाठीशी उभा राहून मतदान रूपी आशीर्वाद देऊन राज्यात २५० पेक्षा अधिक जागा महायुती सरकारला मिळाल्या. मात्र, महायुती सरकारने छगनराव भुजबळ यांना मंत्रिमंडळाच्या शपथविधीपासून वंचित ठेवल्याने ओबीसी समाजामध्ये रोष निर्माण झाला आहे. यावेळी राऊत यांनी ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी गेल्या ४० वर्षांपासून छगनराव भुजबळ यांनी लढा दिला असून, त्यांचे योगदान ओबीसी समाजासाठी महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. नुकत्याच झालेल्या निषेध धरणे आंदोलनात समता सैनिक आणि ओबीसी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये शहराध्यक्ष निखील शिंदे, राम मेजर राऊत, नितीन राऊत, धनंजय काळे, सुमंत राऊत, सावता काळे, मंगेश जमदाडे, संग्राम भोकरे, युवराज गार्डे, ज्ञानेश्वर राऊत, अजय राऊत, कार्तिक गनगे, महेश चौधरी, अजय काळे, महेश राऊत, संजय काळे, संतोष यादव यांच्यासह अनेक नेते व कार्यकर्ते सहभागी झाले होते.



# सहायता निधीची रक्कम वाढवा, रूग्णसंख्या अमर्याद करा-खा.नीलेश लंके यांची लोकसभेत आग्रही मागणी

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**
पंतप्रधान राष्ट्रीय सहायता निधी अंतर्गत रूग्णांना देण्यात येणारी ३ लाख ही कमाल रक्कम वाढविण्यात यावी तसेच एका सदस्याची ३५ रूग्णांची मर्यादा हटवून ती अमर्याद करण्याची आग्रही मागणी नगरचे खासदार नीलेश लंके यांनी सोमवारी लोकसभेत केली.

लोकसभेत सभागृहाचे लक्ष वेधताना खा. लंके म्हणाले, पंतप्रधान राष्ट्रीय सहायता निधी अंतर्गत देण्यात येणारी कमाल रक्कम तीन लाख रूपये आहे. आजाराचा संपूर्ण खर्च भागविण्यासाठी ही रक्कम पुरेशी नसून ही मर्यादा वाढविण्याची गरज आहे. पंतप्रधान राष्ट्रीय सहायता निधीअंतर्गत एक वर्षात एका सदस्याला ३५ रूग्णांना मदत करता येते. ही मर्यादा योग्य नाही. ही मर्यादा काढून टाकून ती अमर्याद करण्यात यावी अशी मागणी लंके यांनी केली.

पंतप्रधान राष्ट्रीय सहायता निधी अंतर्गत नेमण्यात आलेल्या पॅनलमध्ये रूग्णालयांची संख्या वाढविण्याची आवष्यकता आहे. ही संख्या लवकरात लवकर वाढवून एका तालुक्यात किमान एक रूग्णालय या पॅनलमध्ये घेण्याची मागणीही लंके यांनी केली. पंतप्रधान राष्ट्रीय निधी अंतर्गत पाठविण्यात येणारे प्रस्ताव हे पोष्टाने मागविले जातात. त्यात बदल करून हे प्रस्ताव ऑनलाईन मागविण्यात यावेत जेणेकरून रूग्णाला कमी वेळेत लवकरात लवकर आर्थिक मदत मिळू शकेल असेही लंके यांनी सांगितले. या योजनेअंतर्गत एखादा विशेष बाब हा पर्याय असायला हवा. एखाद्या रूग्णाचा आजार सुचीमध्ये नसेल तर विशेष बाब या पर्यायातून त्या रूग्णाला मदत करता येईल. असेही लंके यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. पंतप्रधान राष्ट्रीय सहायता निधी अंतर्गत रूग्णांना देण्यात येणारी ३ लाख ही कमाल रक्कम वाढविण्यात यावी व रूग्णसंख्या अमर्याद करण्याची मागणी खा. नीलेश लंके यांनी सोमवारी लोकसभेमध्ये केली.




### खा लंके यांचा कोटा ६ महिन्यात संपला !

**एक वर्षात एका सदस्याला ३५ रूग्णांना मदत करता येते. खा. नीलेश लंके यांनी या योजनेअंतर्गत शेकडो प्रस्ताव दाखल केले असून सहा महिन्यात त्यांचा कोटा संपला आहे. तर अनेक प्रस्ताव प्रलंबित आहे. यासंदर्भात त्यांनी संबंधित मंत्री तसेच अधिकाऱ्यांची भेट घेउन प्रलंबित रूग्णांना मदत करण्याची गळ घातली आहे. त्याच पार्श्वभुमीवर सदस्यांसाठी अमर्याद कोटा देण्याची मागणी लोकसभेमध्ये केली आहे. विधानसभेत काम करताना खा. नीलेश लंके यांनी मुख्यमंत्री सहायता निधीमार्फत राज्यात सर्वाधिक रूग्णांना मदत मिळवून दिली असून पंतप्रधान सहायता योजनेतूनही जास्तीत जास्त रूग्णांना मदत मिळवून देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.**

### एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत नाराजीचा भडका

# मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने ५ बडे नेते नाराज,एकाचा शिवसेना उपनेतेपदाचा राजीनामा

**मुंबई (वृत्तसंस्था)**–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारचा रविवारी मंत्रिमंडळ विस्तार झाला. त्यात शिवसेनेच्या अब्दुल सत्तार, तानाजी सावंत, दीपक केसरकर, विजय शिवतारे व प्रकाश सुर्वे ५ बड्या नेत्यांना स्थान मिळाले नाही. त्यामुळे आता या नेत्यांसह त्यांचे शेकडो समर्थक अस्वस्थ असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. या ५ जणांसह अन्य एका नेत्याने तर शिवसेना उपनेतेपदाचा राजीनामा देऊन आपली खदखद व्यक्त केली आहे. यामुळे आगामी दिवसांत सत्ताधारी शिवसेनेत मोठे राजकारण रंगण्याची चिन्हे आहेत.महायुती सरकारच्या मंत्रिमंडळ विस्तारात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या कोट्यातून शंभूराज देसाई, उदय सामंत, दादा भुसे, गुलाबराव पाटील, संजय राठोड, संजय शिरसाट, प्रताप सरनाईक, भरत गोगावले, प्रकाश आबिटकर या ९ जणांना कॅबिनेट मंत्रिपद मिळाले. तर आशिष जयस्वाल व योगेश कदम यांना राज्यमंत्रिपद मिळाले. या विस्तारातून छत्रपती संभाजीनगर



जिल्ह्यातील सिल्लोडचे आमदार तथा माजी मंत्री अब्दुल सत्तार, माजी आरोग्यमंत्री तानाजी सावंत व माजी शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांना वगळण्यात आले.याशिवाय विजय शिवतारे व प्रकाश सुर्वे या दोन नेत्यांचाही यावेळी मंत्रिमंडळात समावेश होणार असल्याची माहिती होती. पण भाजपच्या दबावामुळे या पाचही नेत्यांना मंत्रिपदाची संधी मिळाली नाही. आता हे नेते नाराज झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. अब्दुल सत्तार यांनी या प्रकरणी अद्याप आपली प्रतिक्रिया दिली नाही. तर तानाजी सावंत हे नॉट रिचेबल आहेत. त्यांच्या कार्यालयाने पत्रकारांना सावंत प्रतिक्रियेसाठी सध्या उपलब्ध नसल्याचे सांगितले आहे.दुसरीकडे, दीपक केसरकर यांनी पक्षश्रेष्ठींचा निर्णय मान्य असल्याचे सांगत आपण पक्षावर नाराज नसल्याचे सांगितले आहे. मी पक्षाच्या निर्णयावर नाराज नाही. माझ्या चेहऱ्यावरही कुठे नाराजी दिसत नाही. जनतेने महायुतीला स्पष्ट बहुमत दिले आहे. त्यामुळे त्या स्पीरिटने काम देखील झाले पाहिजे. आता नवे सरकार व त्याचे मंत्री आलेत. नव्या मंत्र्यांच्या चेहऱ्यावर किती आनंद आहे हे पाहा. त्यांच्या आनंदात आपण सहभागी झाले पाहिजे, असे ते म्हणालेत.

विजय शिवतारे यांनीही या प्रकरणी आपली नाराजी उघडपणे मांडली आहे. हा मंत्रिमंडळ विस्तार मला विश्वासात न घेता झाला. त्यामुळे आता अडीच वर्षांनी मला मंत्रिपद दिले तरी मी ते घेणार नाही, असे ते म्हणालेत. आमदार प्रकाश सुर्वे यांनीही या प्रकरणी आपली नाराजी व्यक्त केली.दरम्यान, मंत्रिपदासाठी इच्छूक असलेल्या भंडारा विधानसभा मतदारसंघाचे शिवसेनेचे आमदार नरेंद्र भोंडेकर यांनीही आपल्या मनातील खदखद व्यक्त केली आहे. त्यांनी मंत्रिपद न मिळाल्यामुळे उघडपणे एकनाथ शिंदेंवर टीका करत देवेंद्र फडणवीस यांची भाजप येण्याची ऑफर नाकारल्याचा आता पश्चाताप होत असल्याचा दावा केला आहे. भोंडेकर यांनी यासंबंधी शिवसेना उपनेतेपदाचा राजीनामाही दिला आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे आपल्या नाराज नेत्यांची कशी मनधरणी करणार याकडे अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

# रामदास आठवलेंची भाजपने मागितली माफी


### आमची मोठी चूक झाली, मंत्रिमंडळ शपथ विधीचे निमंत्रणच दिले नाही–बावनकुळे

**पुणे (वृत्तसंस्था)**
महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा रविवारी विस्तार झाला. नागपूरच्या राजभवनमध्ये पार पडलेल्या या सोहळ्याचे महायुतीचा भाग असलेले रामदास आठवले यांना निमंत्रणच देण्यात आले नव्हते. यावरून रामदास आठवले यांनी आपली नाराजी उघडपणे जाहीर केली होती. रामदास आठवलेंच्या नाराजीवरून भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांची माफी मागितली आहे. आमच्याकडून चूक झाल्याचे बावनकुळे म्हणाले.नागपूर येथील राजभवनमध्ये मंत्रिमंडळाचा शपथविधी पार पडला. यामध्ये ३३ जणांनी कॅबिनेट तर ६ जणांनी राज्यमंत्रीपदाची घेतली. सरकारकडून या शपथविधी सोहळ्याचे विरोधी पक्षाला निमंत्रण गेले होते. मात्र महायुतीत सहभागी असलेल्या रिपाइं आठवले गटाला निमंत्रण देण्याचे राहून गेले. त्यामुळे रामदास आठवले नाराज झाले होते. त्यांच्या नाराजीची भाजपने अखेर दखल घेतली आहे.
मंत्रिमंडळ विस्ताराचे निमंत्रण न भेटल्यामुळे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी रामदास आठवले यांची माफी मागितली. मी रामदास आठवले यांची माफी मागतो. त्यांना गडबडीत मंत्रिमंडळ विस्ताराचे निमंत्रण वेळेत पोहचले नाही. आमच्याकडून चूक झाली आहे, असे म्हणत बावनकुळे यांनी आठवलेंची जाहीर माफी मागितली. ते आज पुण्यात बोलत होते.चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी मंत्रिमंडळावरही भाष्य केले. मंत्रिमंडळात कोणाला घ्यायचे कोणाला नाही हा मुख्यमंत्र्यांचा निर्णय असल्याचे त्यांनी सांगितले. तर छगन भुजबळ यांना भविष्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि महायुती चांगले स्थान देईल, असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला. सुधीर मुनगंटीवार आणि इतरांची मंत्रीपदावरुन कोणतीही नाराजी नाही. राष्ट्रवादी आणि शिवसेना त्यांच्या पक्षातील नाराजांची नक्कीच समजूत काढतील, असा दावा चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला. घराणेशाहीचा आरोप योग्य नाही. ज्यांना मंत्री मंडळात स्थान मिळाले ते घराणेशाहीमुळे नाही, तर त्यांच्या कर्तृत्वाने मिळाले असल्याचे ते म्हणाले.

### कापसाला भाव नसल्याने शेतकरी हवालदिल

# शेतकऱ्यांची मुद्दलही निघेना शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे शेतकरी निराश

**विहामांडवा । प्रतिनिधी**
एकीकडे निसर्ग कोपला तर अधून-मधून पडणारी अतिवृष्टी आणि दुसरीकडे शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे शेतीची पूर्ण वाट लागली आहे. कापसाला भाव नसल्याने शेतकरी हवालदील झाला आहे. शेतकऱ्यांचे कैवारी, पाठीराखे म्हणत राजकारण करणारे राज्यकर्ते लोक, प्रतिनिधी शेतकऱ्यांच्या बाबतीत एवढे निगरगट्ठ का, असा सवाल शेतकरी उपस्थित करीत आहे.वाढत्या महागाईची झळ शेतकऱ्यांना सोसावी लागत आहे. महागाई वाढताच कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ केली जाते. एकीकडे वाढती महागाई तर दुसरीकडे खते, बी-बियाणे, मजुरीचे वाढलेले दर पाहता शेतीचा खर्च परवडेनासा झाला आहे. त्या तुलनेत शेतीमालाचे दर मात्र खाली येत आहे. उत्पादन खर्चावर आधारित



पन्नास टक्के नफा धरून शेतीमालाला दर देऊ असे आश्वासन सरकारने दिले; पण प्रत्यक्षात पन्नास टक्के तर सोडाच हमी भावाच्या खाली शेतकऱ्यांना माल विकावा लागत आहे. मागील तीन वर्षाआधी १० हजार ते ११ हजारांवर असलेले कापसाचे दर यावर्षी ७२०० रुपयांच्या खाली आल्याने शेतकरी पुरता खचला आहे. कापूस पिकाचा खर्च काढला तर कापूस उत्पादक शेतकरी आज तोट्यात आहेत. खर्च जास्त, मेहनत जास्त आणि उत्पन्न पाहता त्याच्या पदरात काय पडते, उत्पन्न कमी आणि खर्च जास्त अशी अवस्था कापूस उत्पादक शेतकऱ्यांची झाली आहे. मग शेतीवर अवलंबून असलेल्या या शेतकऱ्याने कुटुंबाचा गाढा कसा हाकलावा, बँकाचे कर्ज कसे चुकता करायचे, असे नानाविध प्रश्न त्यांच्यासमोर आहे. राज्यकर्ते लोकप्रतिनिधी मात्र आजही शेतकऱ्यांच्या प्रश्नावर पोळी भाजून घेण्यात मग्न आहे. सरकार कोणाचेही असो, शेतकरी मात्र भरडल्या जात आहे. शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित योग्य भाव मिळालाच पाहिजे. यासाठी शेतकऱ्यांनी आता पुढे येण्याची गरज आहे.

### इंडिया आघाडीच्या आंदोलनात खा.लंके यांचा सहभाग

# संतोष देशमुख हत्या,बांगलादेशातील अत्याचाराविरोधात आंदोल

**पारनेर । प्रतिनिधी**
बीड जिल्हयातील मस्साजोगचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांची अमानुष हत्या तसेच बांगलादेशातील हिंदू व ख्रिश्चन बांधवांवर होत असलेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ इंडिया आघाडीच्या खासदारांनी संसदेच्या कामकाजास सुरूवात होण्यापूव संसदेसमोर आंदोलन केले. नगरचे खासदार नीलेश लंके हे या आंदोलनात सहभागी झाले होते.

हत्येचा आरोप असलेल्या सर्व आरोपींना तात्काळ अटक करा, खुनाचे कारण असलेल्या खंडणी प्रकरणातील आरोपींना हत्येच्या गुन्हयात आरोपी करा, आरोपींना अटक करून खटला अंडर ट्रायल चालवा, अशा प्रकारच्या खंडणी, अपहरण, छळ, खुनाच्या सर्व गुन्हयांचा तपास केंद्रीय गुप्तचर विभागाकडून करण्यात यावा, बीड जिल्हयामध्ये कायद्याचे राज्य स्थापन करा अशा मागण्या यावेळी इंडिया आघाडीच्या खासदारांकडून करण्यात आल्या. बांगलादेशात




हिंदू आणि ख्रिश्चनांवर होणाऱ्या अत्याचारावर केंद्र सरकार बोलत नाही म्हणून खासदारांनी हातात बांगलादेशातील हिंदू आणि ख्रिश्चनांच्या पाठीशी उभे रहा असे लिहिलेल्या बॅग हाती घेत आंदोलन केले. कॉंग्रेसच्या खासदार प्रियंका गांधीही या आंदोलनात सहभागी झाल्या होत्या.

# मराठवाडा साहित्य परिषदेवर प्रा.डॉ.दिलीप बिरुटे यांची निवड

**छ.संभाजीनगर । प्रा संजय तुपे**
मराठवाडा साहित्य परिषद छत्रपती संभाजीनगर येथे कार्यकारिणीच्या नवनिर्वाचित सदस्यांची पहिल्या बैठकीत मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांच्या नवनिर्वाचित कार्यकारिणीने प्रा.डॉ. दिलीप बिरुटे यांची दुसऱ्यांदा 'निमंत्रित सदस्य' व कार्यक्रम 'समिती सदस्य म्हणूनही निवड



केली आहे. गंगापूर येथील रहिवासी असलेले प्रा.डॉ. दिलीप बिरुटे, लेखक, सम ीक्षक, आंतरजालावर विविध विषयांवर लेखन करणारे लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अभ्यास मंडळावर ते सदस्य, तिफण वाचक चळवळीच्या राज्य अध्यक्ष असून मराठी साहित्य विषयावर विविध शोधनिबंध तसेच विविध परिसंवादात त्यांचा सहभाग राहिला आहे. 'जागतिकीकरण आणि मराठी साहित्य' हा ग्रंथ प्रकाशित आहे. मराठवाडा साहित्य परिषद, ही मराठवाड्यातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील नावलौकिक साहित्य संस्था आहे.

# मुख्यमंत्री वयोश्री योजनेच्या लाभार्थ्यांना आवाहन

**जालना । असलम कुरेशी**
राज्यातील ६५ वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी व वयोमानापरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने, उपकरणे खरेदीसाठी मुख्यमंत्री वयोश्री योजना सुरु करण्यात आली आहे. जालना जिल्ह्यात मुख्यमंत्री वयोश्री योजनेतंर्गत ५ हजार ११३ पात्र लाभार्थींना शासनाकडून प्रत्येकी ३ हजार रुपये आधार संलग्न बँक खात्यात रक्कम जमा केली आहे. तरी अशा लाभार्थ्यांनी शासन निर्णयातील नियमानुसार साहित्य, उपकरणे खरेदी करुन त्याचे देयक (पावती) सहायक आयुक्त समाजकल्याण जालना यांच्या कार्यालयात जमा करावेत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# सैन्य दलातील अधिकारी पदाच्या पुर्व प्रशिक्षणाची संधी

**जालना । असलम कुरेशी**
भारतीय सैन्यदल, नौदल आणि वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना सर्विस सिलेक्शन बोर्ड या परीक्षेची मोफत पुर्व तयारी करुन घेण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक येथे महाराष्ट्र शासनाकडून एसएसबी कोर्स क्र. ६४ आयोजित करण्यात येणार आहे. तरी जालना जिल्ह्यातील इच्छूक युवक-युवतींनी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, जालना येथे गुरुवार दि. १३ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत मुलाखतीस हजर रहावे. संपुर्ण प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थ्यांना नि:शुल्क प्रशिक्षण, निवास व भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. अधिक माहितीसाठी दुरध्वनी क्र. ०२५३-२४५१०३२ किंवा व्हॉट्सअप क्र. ९१५६०७३३०६ वर संपर्क करावा, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077